गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष २ रे ● अंक ०५ वा ● बुधवार २२ मे २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 05 | Date : 22/05/2024 blow Wednesday Page 4 Price 4

## मामाच्या गावी आलेल्या मुलाचा जड वाहतुकीने घेतला बळी

**सोलापूर/प्रतिनिधी**

उन्हाळी सुट्टीनिमित्त हैदराबादहून सोलापुरात मामाच्या घरी आलेल्या एका आठ वर्षाच्या मुलाचा जड वाहतुकीने बळी घेतल्याची घटना नई जिंदगी परिसरात घडली. असद गौस शेख असे या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या दुर्दैवी मुलाचे नाव आहे. तो हैदराबाद येथे आई-वडिलांसह राहात होता. त्याचे आजोळ सोलापुरात होते. उन्हाळी सुट्टीनिमित्त तो काही दिवसांपूर्वी नई जिंदगी परिसरात नागनाथ नगरात मामाच्या घरी आला होता. दरम्यान, मंगळवारी सकाळी मामाच्या दुचाकीवर पाठीमागे बसून असद हा कुंभारी येथील गोदूताई परूळेकर महिला विडी घरकूल परिसरात पाहुण्याकडे निघाला होता. फरंतु वाटेत प्रचंड धूळ उडवत येणा-या एका हायवा मालमोटारीचा धक्कोका बसला आणि मामा-भाचा । पान २ वर

# बारावीचा निकाल जाहीर; मुलींनी मारली बाजी

**पुणे/दैनिक यशसिध्दि न्यूज**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे (राज्य मंडळ) घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला. यंदा बारावीचा निकाल ९३.३७ टक्के लागला आहे. सर्वाधिक ९७.५१ टक्के निकाल कोकण विभागाचा, तर मुंबई विभागाचा सर्वांत कमी ९१.९५ टक्के निकाल लागला.

राज्य मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी पत्रकार परिषदेत निकाल जाहीर केला. मंडळाच्या सचिव अनुराधा ओक, माणिक बांगर या वेळी उपस्थित होते. यंदा बारावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते



२३ मार्चदरम्यान घेण्यात आली. यंदा राज्यातील १५ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी नोंदणी केली होती. त्यात विज्ञान शाखेसाठी सर्वाधिक सात लाख ६० हजार ४६ विद्यार्थी, कला शाखेसाठी तीन लाख ८१ हजार ९८२, वाणिज्य शाखेसाठी तीन लाख २९ हजार ९०५, व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी ३७ हजार २२६, आयटीआयसाठी चार हजार ७५० विद्यार्थ्यांचा समावेश आहे. राज्यातील ३ हजार ३२० केंद्रांवर परीक्षा घेण्यात आली.

यंदाच्या निकालात मुलांच्या तुलनेत मुलींच्या उत्तीर्णतेचे प्रमाण जास्त आहे. ९२.६० टक्के मुलगे, तर ९५.४९ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या आहेत. यंदा निकाल वाढल्याचे स्पष्ट झाले आहे. विद्यार्थी, पालकांना दुपारी एक वाजल्यापासून निकाल ऑनलाइन पाहता येईल. विद्यार्थ्यांना mahahsscboard.in, mahresult.nic.in या संकेतस्थळावरून निकाल पाहता येणार आहे. गोसावी म्हणाले, की बारावीची सहा माध्यमांतील १५४ विषयांची परीक्षा घेण्यात आली. अंतर्गत परीक्षेचे गुण ऑनलाइन घेतल्यामुळे निकाल लवकर जाहीर होण्यास मदत झाली. गैरप्रकारांची संख्या घटली. राज्यस्तरावर २७१ भरारी पथके नेमण्यात आली होती, तसेच जिल्हा स्तरावरही स्वतंत्र भरारी पथके नियुक्त करण्यात आली होती.

## सोलापूर जिल्ह्याचा बारावीचा निकाल ९२.९७ टक्के

**सोलापूर/प्रतिनिधी:**

राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळातर्फे फेब्रुवारी- मार्च २०२४ मध्ये घेतलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल मंगळवारी दुपारी एक वाजता ऑनलाईन जाहीर केला आहे. या निकालात सोलापूर जिल्ह्याचा निकाल ९२.९७ टक्के इतका लागला आहे. सोलापूर जिल्ह्यात ३२ हजार १७५ मुले व २४ हजार ४२४ मुली अशा एकूण ५६ हजार ५९९ विद्यार्थ्यांनी बारावीची परीक्षा दिली. त्यातून २९ हजार २३७ मुले (९०. ६८ टक्के) व २३ हजार ३८८ मुली (९५.७५ टक्के) असे एकूण ५२ हजार ६२५ विद्यार्थी (९२. ९७ टक्के) उत्तीर्ण झाले. जिल्ह्याचा विज्ञान शाखेचा निकाल ९७.३१ टक्के, कला शाखेचा निकाल ८७. ८५ टक्के, वाणिज्य शाखेचा निकाल ९३.३ टक्के, व्यावसायिक अभ्यासक्रमाचा निकाल ८९.५१ टक्के तर विज्ञान व तंत्रज्ञानचा निकाल ९३.६७ टक्के इतका लागला असल्याची माहिती माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी दिली आहे.

## विशाल अग्रवालच्या वडिलांचे छोटा राजनशी संबंध, खुनाच्या प्रयत्नाच्या गुन्ह्यात पोलिसांचा या आधीही वरदहस्त

**पुणे/दैनिक यशसिध्दि न्यूज**

पुणे कार अपघातात एक धक्कादायक खुलासा झाला असून अग्रवाल कुटुंबीयांना पोलिसांचा वरदहस्त हा काही नवा नसल्याचं समोर आलं आहे. तसेच अग्रवाल कुटुंबीयांचं अंडरवर्ल्ड कनेक्शन समोर आलं असून त्यासंबंधी एबीपी माझीकडे एक्सक्लुझिव्ह माहिती आहे. विशाल अग्रवाल यांचे वडील सुरेंद्र कुमार अग्रवाल यांचे अंडरवर्ल्ड डॉन छोटा राजनशी संबंध असल्याची माहिती उघड झाली आहे. पुण्यात दारूच्या नशेत गाडी चालवून दोन जणांचा जीव घेणाऱ्या वेदांत अग्रवाल या अल्पवयीन मुलाचे वडील विशाल अग्रवाल यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आलं आहे. या प्रकरणी त्यांना अटक करण्यात आली असून त्यांच्या कुटुंबीयांची छोटा राजनसोबत संबंध असल्याचं उघड झालं आहे.



भावांसोबत असलेल्या संपत्तीच्या वादात वेदांत अग्रवालच्या आजोबांनी छोटा राजनची मदत घेतली होती. या प्रकरणी अजय भोसले नावाच्या व्यक्तीच्या हत्येच्या प्रयत्नामध्ये सुरेंद्र कुमार अग्रवाल यांच्याविरोधात बंड गार्डन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असल्याचं समोर आलं आहे.मात्र या प्रकरणात मोक्का लावणं अपेक्षित असनाताही पुणे पोलीसांनी केवळ आयपीसीची कलमं लावून त्यांच्यावर गुन्हा दाखल केला होता. आरोपत्रही दाखल करेपर्यंत विशाल अग्रवालचे वडील सुरेंद्र कुमार अग्रवाल यांना अटक झाली नव्हती.

वेदांत अग्रवालची हमी देण्यासाठी आलेल्या त्याच्या आजोबांचे, सुरेंद्र अग्रवालांचे संबंध हे थेट छोटा राजनशी असल्याचं समोर आलं आहे. सन २००७-०८ च्या दरम्यानचं एक प्रकरण समोर आलं आहे. मुंबई सत्र न्यायालयात छोटा राजनशी । पान २ वर

## इराणचे राष्ट्राध्यक्ष राईसी यांचे अपघाती निधन

**तेहरान/दैनिक यशसिध्दि न्यूज**

हेलिकॉप्टर दुर्घटनेत इराणचे राष्ट्राध्यक्ष इब्राहिम राईसी यांचे निधन झाले. त्यामुळे इराणमध्ये पाच दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर करण्यात आला आहे. दरम्यान, उपराष्ट्रपती मोहम्मद मोखबर यांची हंगामी राष्ट्राध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांनी मोखबर यांच्याकडे अंतरिम पदभार सोपवला. हेलिकॉप्टर अपघातात परराष्ट्रमंत्री होसेन अमीर-अब्दुल्लाहियान यांचा मृत्यू



झाला आहे. इराणचे सर्वोच्च आण्विक वार्ताकार अली बघेरी यांना कार्यवाहक परराष्ट्रमंत्री म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

राष्ट्राध्यक्ष राईसी आणि परराष्ट्रमंत्री अब्दुलाहियानी यांना घेऊन जाणारे हेलिकॉप्टर रविवारी पूर्व अझरबैजान प्रांतातील घनदाट जंगलात कोसळले. या दुर्घटनेत इराणचे राष्ट्राध्यक्ष राईसी, परराष्ट्र मंत्री हुसेन अमीरअब्दुल्लाहियान, पूर्व अझरबैजानचे गव्हर्नर मलेक रहमाती यांच्यासह नऊ जणांचा मृत्यू झाला. इराणमध्ये पाच दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर करण्यात आला आहे.

## लोकसभेच्या निकालानंतर उद्धव ठाकरे भाजपाबरोबर जातील, प्रकाश आंबेडकरांच्या दाव्यानंतर शरद पवार म्हणाले

**पुणे/दैनिक यशसिध्दि न्यूज**

लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर उद्धव ठाकरे भारतीय जनता पार्टीला पाठिंबा देतील असा दावा वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी काही दिवसांपूर्वीच पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि महायुतीला बिनशर्त पाठिंबा दिला आहे. त्यापाठोपाठ आता उद्धव ठाकरेदेखील भाजपाबरोबर जातील असा दावा प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे. आंबेडकर म्हणाले, लोकसभेच्या निकालानंतर दोन्ही भाऊ तुम्हाला भाजपाबरोबर दिसतील, असं आमचं ठाम मत आहे. यावर आता वेगवेगळ्या राजकीय प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार या पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी मात्र आंबेडकरांचा दावा खोडून काढला आहे. भारतीय जनता पार्टी लोकसभा निवडणुकीच्या आधी । पान २ वर



## बीड आणि बारामतीमध्ये बोगस मतदान; पवार यांचा गंभीर आरोप

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

राज्यातील ४८ लोकसभा मतदारसंघांमध्ये पाच टप्प्यांत मतदान प्रक्रिया आटोपल्यानंतरही आरोप-प्रत्यारोपांचे सत्र सुरू असून, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे नेते शरद पवार यांनी राज्यातील बीड आणि बारामती लोकसभा मतदारसंघांमध्ये बोगस मतदान झाल्याचा गंभीर आरोप केला आहे. तसेच पवार यांनी याप्रकरणी कारवाई करण्याची मागणी केली आहे. शरद पवार यांनी एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीमध्ये राज्यात बोगस मतदान झाल्याचा गंभीर आरोप केला. ते म्हणाले की, महाराष्ट्रातील बीड, बारामती आणि पुणे हे मतदारसंघ गळले तर राज्यात इतर ठिकाणी शांततेत मतदान झाले. आतापर्यंत महाराष्ट्रामध्ये कधीच पैशाचा वापर झाला नव्हता. मात्र, या निवडणुकीत मोठ्या प्रमाणात पैशाचा वापर झाला. बारामतीमध्ये तर एक बँक रात्री दोन वाजताही उघडी होती. एवढेच नाही तर बारामती आणि बीड लोकसभा मतदारसंघांमध्ये बोगस मतदानाचे प्रकार घडले. बीडमध्ये तर बूथ । पान २ वर

## बालशक्ती पुरस्कारासाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत ३१ जुलैपर्यंत

**सोलापूर/प्रतिनिधी**

केंद्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागामार्फत बालशक्ती पुरस्कार दिला जातो. प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार हा ५ ते १८ वर्षापर्यंत शिक्षण, कला, सांस्कृतिक कार्य, खेळ, नाविन्यपूर्ण कामगिरी केली आहे, अशा बालकांना हा पुरस्कार दिला जातो. प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार २०२५ करिता केंद्र शासनाने अर्ज मागविले आहेत. सदरचे अर्ज http://awards.gov.in या संकेतस्थळा मार्फत ऑनलाईन पध्दतीने स्वीकारले जाणार आहेत. ज्या मुलांचे वय ५पेक्षा अधिक व ३१ जुलै, २०२४ रोजी १८ वर्षापेक्षा कमी आहे व ज्या मुलांनी शिक्षण, कला, सांस्कृतिक कार्य, खेळ, नाविन्यपूर्ण शोध, सामाजिक कार्य व शौर्य अशा क्षेत्रात विशेष नैपुण्यपुर्ण कामगिरी केली आहे, त्यांचे प्रस्ताव वरील संकेतस्थळावर स्वत: मुले किंवा त्यांच्या वतीने राज्य सरकार, केंद्रशासित प्रदेश, जिल्हाधिकारी / जिल्हादंडाधिकारी, पंचायत राज्य संस्था, नागरी स्वराज संस्था, शैक्षणिक संस्था इ.अर्ज करु शकतात. जिल्ह्यातील जास्तीत-जास्त मुलांनी प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन जिल्हा बालसंरक्षण अधिकारी अतुल वाघमारे यांनी केले आहे.

# उजनी धरणात बोट पलटली, ६ जण बुडाले

## PSI पोहत-पोहत काठावर आले; रात्रीच्या अंधारात शोध सुरू

**सोलापूर/पुणे :**

नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी येथील धावली धरणात बुडून ५ जणांचा मृत्यू झाल्याची भीषण दुर्घटना दुपारी घडली असतानाच आणखी एक दुर्घटना समोर आली आहे. सोलापूर जिल्ह्यातील उजनी धरणात एक बोट बेपत्ता झाली असून ही दुर्घटना इंदापूर तालुक्यातील कळाशी येथील परिसरात घडली आहे. विशेष म्हणजे या बोटीतून पोलीस उपनिरीक्षक राहुल डोंगरे हे बोट पलटी झाल्यानंतर पोहत-पोहोचत कळाशी गावच्या काठावर पोहोचले आहे. राहुल डोंगरे हे काढावर पोहोचल्यांतर या घटनेचा उलगडा झाला. त्यानंतर, पोलीस प्रशासनाने घटनास्थळी धाव घेत बोटीची



शोधमोहिम सुरू केली आहे. या बोटीतून ७ जण प्रवास करत होते. त्यापैकी, राहुल डोंगरे हे सुरक्षीत आहेत. मात्र, बोटीतील इतर प्रवाशांचा शोध सुरू आहे.

इंदापूर तालुक्यातील कुगावं ते कळाशी या जलमार्गावरी ही बोट वाहतूक चालू होती. या बोटीतून एकूण ७ प्रवासी प्रवास करत होते. गावातील जोडपे, त्यांची दोन लहान मुले, एक पोलीस उप निरीक्षक, कुगाव येथील एक तरुण आणि बोट चालक, असे ७ प्रवासी संध्याकाळच्या सुमारास प्रवास करत होते. मात्र, गेल्या काही दिवसांपासून बदलत्या हवामानाचा फटका बसल्याने ही दुर्घटना झाली. सायंकाळी सहाच्या दरम्यान सुटलेल्या वादळी वाऱ्याने बोट पलटली व सर्वच प्रवाशी पाण्यात बुडाले. यावेळी पोलीस उप निरीक्षकाने पाण्यात उडी टाकून स्वत:चा बचाव करण्याचा प्रयत्न केला. ते पोहत-पोहोत काठावर आले. त्यामुळे, या घटनेची माहिती मिळाली. मात्र, अद्यापही बोटीतून प्रवास करणारे इतर ६ जण बेपत्ता आहेत. दरम्यान, आता शोधकार्यासाठी प्रशासन घटनास्थळावर दाखल झाले असून २ तासानंतरही अद्याप बुडालेल्या एकाचाही शोध लागलेला नाही. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच इंदापूरचे आमदार दत्तात्रय भरणे घटनास्थळी पोहोचले आहेत. तर, खासदार सुप्रिया सुळे यांनी ट्विट करुन बुडालेल्या प्रवाशांसाठी प्रार्थना केली आहे.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय

### सध्या केविलवाणा प्रयत्न ..

उध्दव ठाकरे सध्या अस्वस्थ झाले असून प्रचारसभांमधून विकासकामे, देशापुढील समस्या, आव्हाने यावर न बोलता भाजपवर, विशेषत: भाजप नेत्यांवर शिवराळ भाषेत टीका करण्याचाच एककलमी कार्यक्रम त्यांच्याकडून राबविला गेला. मुळातच भाजप आणि भाजप नेत्यांवर आरोप करताना उध्दव हे जनसामान्यांमध्ये स्वत:चेच हसे करून घेत आहेत. सभ्यतेचा बुरखा पांघरण्याचा प्रयत्न करत आहेत, पण त्यांचे हे फसवे प्रयत्न उघडे पडले असून जनतेसमोर त्यांचा खरा चेहरा गेल्या काही वर्षांमध्ये सातत्याने पुढे आलेला आहे. त्यातून आत्मपरीक्षण न करता, चुकांचा शोध घेत त्यातून बोध न घेता त्यांचा खोटे बोल पण रेटून बोल असा जीवनक्रम बनला आहे. आनुवंशिकतेने वारसा मिळतो, नाव-आडनाव मिळते, पण कार्यातून तो वारसा टिकवावा लागतो, जोपासावा लागतो, हे आज ठाकरेंना ठणकावून सांगण्याची वेळ खऱ्या अर्थाने आलेली आहे. ज्या शरद पवारांच्या विरोधात बाळासाहेब ठाकरेंनी सातत्याने प्रचार केला, रणशिंग फुंकले, कधी राजकीय जवळीक केली नाही, त्या पवारांचे गोडवे गाण्याची वेळ आज उध्दव यांच्यावर आलेली आहे. १९९१ साली विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनादरम्यान छगन भुजबळांनी शिवसेनेला 'जय महाराष्ट्र' करत काँग्रेसमध्ये प्रवेश केला. शिवसेनेत पहिल्यांदा फूट पडली, त्यामागचे खरे सूत्रधार शरद पवारच होते. ज्यांनी शिवसेना फोडली, त्यांच्याच खांद्याला खांदा लावून महाआघाडीच्या उमेदवारांचा प्रचार करण्यात उध्दव धन्यता मानत आहे. ज्या भुजबळांनी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरेंना तुरुंगात टाकण्याची पूर्ण तयारी केली होती, त्याच भुजबळांना मंत्रिमंडळात घेऊन मुख्यमंत्रिपदावरून राज्याचा कारभार हाकण्यात या उध्दव यांना कोणताही कमीपणा वाटला नाही. ज्या दिवशी काँग्रेससोबत जाण्याची वेळ येईल, त्या दिवशी मी माझे दुकान बंद करेन, अशी भूमिका शिवसेनाप्रमुखांनी अनेकदा जाहीरपणे मांडली होती. आता उध्दव हे माझा बाप चोरला, असा टाहो फोडतात, त्यांनीच काँग्रेसबरोबर अडीच वर्षे राज्यात कारभार चालविला. बाळासाहेब ठाकरेंच्या विरोधात जे भूमिका घेतात, उध्दव हे रक्ताने बाळासाहेबांचे वारस ठरू शकतात, पण विचारांनी अथवा कृतीने नाही, हे महाराष्ट्राने जवळून पाहिले आहे, अनुभवले आहे. भाजप नेत्यांवर टीका करताना उध्दव भाजपचे व आपले हिंदुत्व वेगळे असल्याचा टाहो फोडतात. फक्त आपल्या सोयीनुसार राजकीय कूस बदलताना हिंदुत्वाची व्याख्या लावण्याचा केविलवाणा प्रयत्न सध्या उध्दव यांनी चालविला आहे.

पान १ वरुन

### मामाच्या गावी आलेल्या..

दोघे दुचाकीवरून खाली कोसळले. त्यात छोटा असद हा हायवा गाडीच्या पाठीमागील चाकाखाली चेंगरला गेला. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रूग्णालयात दाखल केले असता त्यास मृत घोषित करण्यात आले. सोलापूर शहरात जड वाहतुकीचे बळी जात असल्यामुळे पोलीस प्रशासनाने शहरात दिवसा जड वाहतुकीवर बंदी घातली होती. केवळ अत्यावश्यक सेवेशी संबंधित जड वाहतुकीला परवानगी आहे. या परवानगी असलेल्या जड वाहतुकीला सुध्दा निश्र्चित केलेल्या रस्त्यावरून वाहतूक करण्याची अट आहे. परंतु नियमांचे उल्लंघन करून शहरात जड वाहतूक राजरोसपणे सुरू असल्याच्या तक्रारी आहेत.

### लोकसभेच्या निकालानंतर उद्धव..

'अब की बार ४०० पार' अशी घोषणा देत होती. मात्र निवडणुक जसजशी पुढे सरकू लागली तसतशी भाजपाची ही घोषणा मागे पडू लागले. भाजपा नेते ३९० आणि नंतर ३७० जागा मिळतील असा दावा करू लागले. दरम्यान, लोकसभेच्या प्रचाराचा आढावा घेणाऱ्या अनेक विश्र्लेषकांनी दावा केला की, विरोधी पक्ष या निवडणुकीत सत्ताधाऱ्यांना जोरदार टक्कर देताना दिसत आहेत. त्याचबरोबर भाजपानेही त्यांच्या प्रचाराचा कार्यक्रम वाढवला. एकट्या महाराष्ट्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना निवडणूक काळात २० हून अधिक दौरे करावे लागले. यावरून महाराष्ट्रातील विरोधी पक्षांचं म्हणजेच महाविकास आघाडीचं मनोबल वाढलं आहे. अशातच ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी दावा केला आहे की, २०१४ आणि २०१९ च्या तुलनेत भाजपाला यावेळी खूप कमी जागा मिळतील. तसेच काँग्रेसच्या जागा वाढतील.

शरद पवार यांनी काही वेळापूर्वी पत्रकार प्रशांत कदम यांच्या युट्यूब चॅनेलला मुलाखत दिली. यावेळी त्यांनी लोकसभा निवडणुकीचं विश्र्लेषण केलं. यावर त्यांना प्रश्र्न विचारण्यात आला की, भाजपाप्रणित एनडीएला बहुमतापेक्षा काही जागा कमी पडल्या आणि त्यांनी उद्धव ठाकरे (शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख) यांना साद घातली तर उद्धव ठाकरे एनडीएत जातील? यावर शरद पवार ठामपणे म्हणाले, अशी अजिबात शक्यता नाही, उद्धव ठाकरे अजिबात म्हणजे अजिबात तिकडे जाणार नाहीत. उद्धव ठाकरे हे भाजपा आणि नरेंद्र मोदींजवळ जाणार नाहीत, बिलकूल जाणार नाहीत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अलीकडेच एका मुलाखतीवेळी उद्धव ठाकरेंबाबत बोलताना मवाळ भूमिका घेतली होती. मोदी म्हणाले होते, माझे उद्धव ठाकरे आणि संपूर्ण ठाकरे कुटुंबाबरोबर जिव्हाळ्याचे संबंध आहेत. भविष्यात उद्धव ठाकरे एखाद्या अडचणीत सापडले तर त्यांच्यासाठी धावून जाणारी पहिली व्यक्ती मी असेन. मोदींच्या या वक्तव्यानंतर ते उद्धव ठाकरे यांना राष्ट्रीय लोकशाही आघाडीत (एनडीएत) येण्यासाठी साद घालत आहेत का? असा प्रश्र्न उपस्थित केला जाऊ लागला आहे. मात्र उद्धव ठाकरे यांनी स्पष्ट केलं आहे की ते कोणत्याही परिस्थिती एनडीएबरोबर जाणार नाहीत. अशीच भूमिका आज शरद पवार यांनीदेखील मांडली.

### विशाल अग्रवालच्या वडिलांचे..

संबंधित सर्व प्रकरणं सीबीआयकडे हस्तक्षेप करण्यात आली होती. त्यामध्ये या प्रकरणाचा समावेश आहे.

या प्रकरणी सुरेंद्र अग्रवाल यांनी छोटा राजनचा हस्तक असलेल्या विजय तांबट याची बँकॉक येथे जाऊन भेट घेतली होती. भावासोबत असलेल्या संपत्तीच्या वादात राजनने आपल्याला मदत करावी अशी मागणी त्यांनी केली होती. नंतर अजय भोसले या व्यक्तीच्या खुनाच्या प्रयत्नात त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या प्रकरणात पोलिसांनी मोक्का लावणे अपेक्षित असताना फक्त आयपीसी कलम लावण्यात आली होती. तसेच चार्जशीट दाखल होईपर्यंत सुरेंद्र अग्रवाल यांना अटकही करण्यात आली नव्हती.नंतर छोटा राजनला भारतात आणल्यानंतर त्याच्याशी संबंधित सर्व प्रकरणं ही सीबीआयकडे ट्रान्सफर करण्यात आली. त्यामध्ये सुरेंद्र अग्रवालांचे हे प्रकरण असल्याचं आता उघड झालंय. दारूच्या नशेत गाडी भरधाव वेगाने चालवणाऱ्या अल्पवयीन वेदांत अग्रवालला तुरुंगात रॉयल ट्रीटमेंट मिळाली आणि १५ तासांमध्ये जामीन मंजूर झाला. पण या आधीही त्याच्या आजोबांच्या बाबतीतही पोलिसांनी विशेष प्रयत्न करून त्यांना मदत केल्याचं आता स्पष्ट झालं आहे. त्यामुळे अग्रवाल कुटुंबीयांवर पुणे पोलिसांचा आधीपासूनच वरदहस्त असल्याचं समोर आलंय.

### बीड आणि बारामतीमध्ये बोगस

कॅप्चरिंगची घटना घडली आहे. पुणे जिल्ह्यामध्येही अशा प्रकारच्या घटना घडताना दिसल्या. त्यामुळे या प्रकारांमध्ये जे कुणी दोषी असतील, त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही शरद पवार यांनी केली. बारामतीमध्ये शरद पवार यांच्या कन्या सुप्रिया सुळे आणि अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार आमनेसामने आलेल्या होत्या. त्यामुळे येथील निवडणूक चुरशीची झाली होती. तसेच येथील प्रचारात अनेक आरोप-प्रत्यारोप झाले होते. तर बीडमध्येही भाजपच्या पंकजा मुंडे आणि शरद पवार गटाचे बजरंग सोनावणे यांच्यात लढत झाली होती.

## जागतिक कासव दिन

२३ मे हा दिवस संपूर्ण जगात जागतिक कासव दिन म्हणून साजरा केला जातो. १९९० पासून हा दिवस संपूर्ण जगात साजरा केला जातो. आपल्या संस्कृतीत कासवाला खूप मानाचे स्थान आहे. हिंदू संस्कृतीत तर कासवाला देवाचे रूप मानले जाते. हिंदू धर्माच्या मंदिराच्या बाहेर तर कासवाची प्रतिकृती आवर्जून असते. देवाचे दर्शन घेण्याआधी भाविक कासवाचे दर्शन घेतात. आपले पूर्वज कासवाचा सांभाळ करत असत. प्रत्येक नदी, विहीर, बारव तलावात कासव वास्तवात असे, पण आज कासवाचे अस्तित्व पणाला लागले आहे. कारण शिकार, व्यापार आणि पाण्याच्या अभावामुळे कासवाचे अस्तित्व पणाला लागले आहे. अनेक दुर्मिळ जातींच्या कासवांचे अस्तित्व नष्ट झाले आहे. आज गोड्या पाण्यातून तर कासवे हद्दपारच झाले आहेत. कासवांचे अस्तित्व आता फक्त समुद्रातच पाहायला मिळते. कासव हा उभयचर प्राणी आहे. पाणी आणि जमीन अशा दोन्ही ठिकाणी कासव राहू शकतो. कासवाचे पोट आणि पाठ खूप टणक असते. समुद्रात राहणाऱ्या कासवाचे सात प्रकार आहेत त्यापैकी भारतात चार प्रकार पाहायला मिळतात. ऑलिव्ह रिडले कासव, ग्रीन टर्टल, हॉक्स बिल टर्टल आणि आणि सागरी कासव हे ते चार प्रकार आहेत. ऑलिव्ह रिडले कासव हे तपकिरी रंगाचे असून ते महाराष्ट्र आणि ओरिसाच्या समुद्रकिनाऱ्यावर



आढळतात. ग्रीन टर्टल कासव म्हणजे हिरव्या रंगाचे कासव हे पूर्व आणि पश्र्चिम किनाऱ्यावर आढळतात. हॉक्स बिल टर्टल म्हणजे चोची सारखे तोंड असलेले कासव अंदमान निकोबारच्या बेटावर आढळतात तर सागरी कासव हे सर्व समुद्रात आढळतात. समुद्रातील कासवांची देखील आता मोठ्या प्रमाणात शिकार होऊ लागली आहे. कासवांच्या पाठीचा दागिन्यांसाठी वापर केला जातो. तसेच कासवांच्या पाठिपासून ढालीही बनवल्या जातात. चामड्याच्या तसेच शोभेच्या वस्तू बनवण्यासाठी कासवांच्या त्वचेचा वापर केला जातो. काहीजण आपल्या घरात शोभेसाठी कासव पाळतात. या सर्व कारणांनी कासवांची शिकार होते. कासवांची शिकार बेकायदेशीर असूनही कासवांची शिकार होते हे विशेष. कासवांचे संवर्धन करण्यासाठी वेळास येथे कासव संवर्धन केंद्र उभारण्यात आले आहे. वेळास येथे दरवर्षी कासव महोत्सवही आयोजित केला जातो. सिंधुदुर्ग जिल्ह्यात ऑलिव्ह रिडले कासवांचे प्रजनन आणि संवर्धन होते. कासवांचे आयुष्य १०० ते १५० वर्ष इतके असते. मात्र शिकारीमुळे अनेक कासवे अकालीच मरण पावतात. कासवांचे अस्तित्व जमीन आणि पाण्यातील जीवनसाखळीसाठी अत्यंत महत्वाचे आहे.

कासवांचे अस्तित्व टिकणे ही काळाची गरज आहे. जर पृथ्वीवरून कासवांचे अस्तित्व नष्ट झाले तर त्याचा पर्यावरणावर मोठा परिणाम होऊ शकतो. कासव हा वन्यजीव असल्याने त्याला घरात बंदिस्त करणे, त्याची हत्या करणे, शिकार करणे हे वन्यजीव कायद्यानुसार गुन्हे आहेत त्यामुळे असे गुन्हे करताना कोणी आढळल्यास त्याची पोलिसांकडे तक्रार करणे हे देशातील नागरिकांचे कर्तव्य आहे. कायद्याचे अस्तित्व टिकवण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करणे, कासवांचे संरक्षण आणि संवर्धन करणे हाच जागतिक कासव दिन साजरा करण्यामागचा उद्देश आहे. हा उदेश यशस्वी व्हावा असे वाटत असेल तर प्रत्येकाने कासवांचे संरक्षण आणि संवर्धन करायला हवे.

## फ्रीज खराब झाला असेल तर घेऊ नका टेंशन, अशा प्रकारे साठवा भाजीपाला, राहतील ताज्या

उन्हाळ्यात अन्नपदार्थ लवकर खराब होतात. अतिउष्णता आणि आर्द्रतेमुळे अन्नपदार्थांमध्ये रासायनिक अभिक्रियाही होऊ लागते. मे-जून महिन्यात दूध किंवा भाजीपाला थोडा वेळ बाहेर ठेवला तर काही वेळाने त्यांना वास येऊ लागतो. दुधाचे फाटते. कधीकधी असे देखील होते की उष्णतेमुळे रेफ्रिजरेटर देखील काम करणे थांबवते किंवा खराब होते.

रेफ्रिजरेटर अचानक बिघडले की भाजी साठवून ठेवण्याचे टेन्शन वाढते. जर फ्रीज अचानक खराब झाला असेल आणि तुम्हाला भाज्या ताज्या ठेवायच्या असतील, तर तुम्ही हे घरगुती उपाय करून कोरडे करा. पालेभाज्यांसाठी टिप्स

फ्रीज अचानक बिघडल्याने तुमच्या पालेभाज्या खराब झाल्याची तुम्हाला काळजी वाटते का? साठवण्यापूर्वी ते स्वच्छ आणि धुवा. टोपली किंवा प्लॅस्टिक बॉक्समध्ये ठेवा आणि ते उघडे सोडा. मधेच त्यावर पाणी शिंपडत रहा. अशा प्रकारे भाज्या साठवा

सिमला मिरची, सोयाबीन किंवा इतर भाज्या फ्रीजच्या बाहेर ठेवायच्या असतील, तर जुन्या पद्धतीचा अवलंब करा. भाज्या स्वच्छ करा आणि नंतर स्वच्छ सुती कपड्यात ठेवा. कपड्यात ठेवण्यापूर्वी ते ओले करा आणि नंतर भाज्या ठेवा. त्यांना अशा ठिकाणी ठेवा, जेथे तापमान सामान्य राहील. हे कापड काही अंतराने पाण्याने ओले करत राहा.


टोमॅटोसाठी उपायटोमॅटो बाहेरही ठेवता येतात, परंतु ते फ्रीजमध्ये ठेवणे चांगले. रेफ्रिजरेटर खराब झाल्यानंतरही ते ताजे ठेवायचे असेल, तर लसणाची रेसिपी करून पहा. यासाठी तुम्ही जिथे टोमॅटो ठेवत आहात तिथे लसणाच्या काही कळ्या सोबत ठेवा.

बटाटा स्टोरेज टिप्सबटाटे किंवा कांदे फ्रीजमध्ये ठेवले नसले तरी उन्हाळ्यात ठेवण्यासाठी काही गोष्टींची काळजी घेणे आवश्यक आहे. बटाटे आणि कांद्यासाठी, आपण ज्या ठिकाणी ठेवत आहात ती जागा जास्त गरम होणार नाही याची विशेष काळजी घ्या.

## मनीष सिसोदियांना धक्का; मद्य धोरण घोटाळा प्रकरणात दिल्ली उच्च न्यायालयाने जामीन अर्ज फेटाळला

**नवी दिल्ली/दैनिक यशसिध्दि न्यूज**

कथित मद्य धोरण घोटाळ्याप्रकरणी दिल्लीचे माजी उपमुख्यमंत्री आणि आम आदमी पक्षाचे नेते मनीष सिसोदिया यांना पुन्हा एकदा मोठा धक्का बसला आहे. कथित मद्य धोरण घोटाळा प्रकरणात ईडी आणि सीबीआय अशा दोन्ही खटल्यांमध्ये दिल्ली उच्च न्यायालयाने त्यांचा जामीन अर्ज फेटाळला आहे. काही दिवसांपूर्वी कनिष्ठ न्यायालयानेही त्यांचा जामीन अर्ज फेटाळला होता. यानंतर आता मनीष सिसोदिया यांच्यावतीने सर्वोच्च न्यायालयात जामिनासाठी याचिका दाखल केली जण्याची शक्यता आहे. कथित मद्य धोरण घोटाळ्याप्रकरणी मनीष सिसोदिया यांना सीबीआयने २६ फेब्रुवारी २०२३ रोजी अटक केली होती. त्यानंतर मनीष सिसोदिया यांना ९ मार्च २०२३ रोजी ईडीकडून अटक झाली होती. तेव्हापासून ते तुरुंगात आहेत. मनीष सिसोदिया यांनी जामीन मिळण्यासाठी दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. मात्र, न्यायालयाने ही याचिका फेटाळून लावली. यावेळी न्यायालयाने सिसोदिया यांना त्यांच्या आजारी पत्नीला आठवड्यातून एकदा भेटण्याची परवानगी दिली.




मनीष सिसोदिया यांच्या जामीनावरील सुनावणीवेळी दिल्ली उच्च न्यायालयाने काही महत्वाचे निरीक्षण नोंदवले. न्यायमूर्ती स्वरकांता शर्मा यांच्या खंडपीठाने म्हटले की, मनीष सिसोदिया यांनी आपल्या अधिकाराचा गैरवापर केला. उत्पादन शुल्क धोरण तयार करताना जनतेचा विश्र्वास तोडला असून सिसोदिया हे प्रभावशाली आहेत. ते जामीन मिळाल्यास पुराव्याशी छेडछाड करू शकतात. तसेच ईडी आणि सीबीआयकडे सबळ पुरावे असल्याचे दिसून येत आहे, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले.

कथित मद्य धोरण घोटाळा प्रकरणात दक्षिण गटाने (साऊथ ग्रुप) अबकारी धोरण बदलण्यासाठी १०० कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याचा आरोप आहे. तसेच यातील पैसे पक्षाकडून २०२२ च्या गोवा विधानसभा निवडणुकीत वापरण्यात आल्याचा आरोप आहे. दरम्यान, याच प्रकरणात दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यावरही ईडीने अटकेची कारवाई केली आहे. दरम्यान, लोकसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी सर्वोच्च न्यायालयाने अरविंद केजरीवाल यांना १ जूनपर्यंत अंतरिम जामीन मंजूर केलेला आहे. मात्र, २ जूनपर्यंत त्यांना पुन्हा आत्मसमर्पण करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. दिल्लीतील कथित मद्य धोरण घोटाळ्याप्रकरणी भारत राष्ट्र समितीच्या नेत्या तथा माजी मुख्यमंत्री केसीआर राव यांची मुलगी के.कविता यांच्यावरही ईडीने अटकेची कारवाई केलेली आहे. के कविता यांचा आम आदमी पक्षाला १०० कोटींची कथित लाच देणाऱ्या 'साऊथ ग्रुप'शी संबंधित असल्याचा आरोप ईडीकडून करण्यात आला आहे.

## भ्रष्ट पोलीस यंत्रणा आणि तितकाच भ्रष्ट आमदार, पुणे अपघातप्रकरणी संजय राऊतांची टीका

**पुणे/दैनिक यशसिध्दि न्यूज**

पुण्यातील कल्याणीनगर येथे पॉर्श कारच्या गाडीखाली दोन तरुणांचा बळी गेला. या गाडीचा चालक अल्पवयीन मुलगा असून त्याच्या वडिलांना संभाजीनगर येथून अटक करण्यात आली आहे. याप्रकरणी पोलिसांनी प्रकरण दाबण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप पुणेकरांकडून केला जातोय. तसंच, स्थानिक आमदार सुनील टिंगरे यांचंही नाव घेतलं जातंय. यावरून ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी पुणे पोलीस आयुक्त आणि आमदार सुनील टिंगरे यांच्यावर टीका केली.पुण्याच्या पोलीस आयुक्तांना बडतर्फ केलं पाहिजे. दोन निष्पाप तरुणांचे बळी गेले आहेत. पुण्याच्या पोलीस आयुक्तांनी कोणाला मदत केली? दोन निष्पाप जीवांचे बळी गेले आणि एक माजुरडा, दारुडा असा तरुण मुलगा जो बिल्डरचा मुलगा आहे. जो दारू पिताना बारमध्ये दिसतोय. तुम्ही त्याचा रिपोर्ट काय देताय? कोणी केलंय हे सगळं?, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.




भ्रष्ट पोलीस यंत्रणा आणि एक तितकाच भ्रष्ट आमदार. पुण्यातील लोकांनी पोलीस आयुक्तांसमोर जाऊन आंदोलन केलं पाहिजे. काय चाललंय हे. आमदार रवींद्र धंगेकर यासाठी उभे ठाकलेले आहेत. २५ वर्षांचे एक जोडपं एका मस्तवाल मुलाच्या निष्काळजीपणामुळे, श्रीमंतीच्या माजुरडेपणामुळे रस्त्यावर तडफडून मेले आणि पोलीस आयुक्त कोणाला वाचवत आहेत? हे अजित पवार गटाचे आमदार आहेत, ते तसेच वागणार. हे माणुसकी शुन्य लोक आहेत. पोलीस ठाण्यात पिझ्झा बर्गर खायला घालताय. खोटा मेडिकल रिपोर्ट देत आहात, त्यांच्या पालकांवर गुन्हा दाखल झाला पाहिजे. आणि अशा लोकांवर पुणेकरांनी सामाजिक बहिष्कार टाकला पाहिजे. असे आयुक्त पुण्याला लाभले असतील तर पुण्याला कलंक आहेत, अशीही टीका त्यांच्यावर करण्यात आली.

पुणे पोलिसांनी दो आँखे बारा हाथ सिनेमा सुरू केला आहे. हा सर्व पैशांचा खेळ आहे. मृतांच्या टाळूवरचं लोणी खाण्याचा प्रकार पोलिस आणि न्यायालयाने केला आहे, अशी टीकाही त्यांनी केली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# छोटीताई–मोठीताई करा वाळवणीची घाई !

## ग्रामीण भागात निर्मिती जोरात : महिलांचा उत्साह प्रखर, परंपरा मनाला घालते भूरळ

**मुन्नाभाई नंदागवळी गोंदिया :**

सद्याचे जग हे तंत्रज्ञान आणि विज्ञान तसेच रेडीमेड मिळते. त्याचाही उपयोग करून ग्रामीण भागात पारंपरिक वाळवण आजही मोठ्या उत्साहाने, तत्परतेने आणि आनंदाने तयार केले जातात हे वास्तव आहे. कला कौशल्य विकसित करणे हा माणसाचा स्थायी स्वभावच आहे. ग्रामीण भागात वाळवण करण्याची प्रत्येक घरी लगबग सुरु आहे. या रेडिमेड व तंत्रज्ञानाच्या जगातही परंपरागत वाळवणीला आजही महत्त्व आहे, हे नाकारता येत नाही. यंत्र, रेडीमेडच्या जमान्यात वाळवणाची परंपरा मनाला घालते भूरळ हे वास्तविक चित्र गाव–गाड्मात पाहायला मिळत आहे. म्हणून मोठीताई– छोटीताई करा वाळवणीची घाई हे ब्रीद सार्थकी लागते. सद्या उन्हाळ्याचा ऋतू सुरू आहे. उन्हाचे चटके सहन होत नाही बाहेर तपनीच्या झळा ह्या शरिराला असह्य होतात. त्यामुळे गावकुसातील महिला वर्ग ह्या सकाळची सर्व कामे आटोपून दुपारच्या सुमारास वाळवण निर्मिती करण्याचा कामाला लागतात.



यामध्ये महिला या आलुपासून आलुचिप्स तयार करतात. भातापासून कुरड्या तयार करतात. तांदळाच्या पिठापासून पापड करतात. स्वच्छ धुतलेल्या गव्हाच्या वाटणापासून शेवयी कुरडी तयार करतात. पळसाच्या पाणावरची पापड करतात. उकळणारी वाफेपासून पापड तयार करतात. जीरा पापड करतात. गव्हाच्या पिठापासून शेवयी तयार करतात. सण, उत्सवांना तेलात तळून खाल्ली जातात. उळदाची दाळ व लाखोरीची दाळीपासून नख वळी तयार केली जाते.

खुला ही आहेत वाळवणीचा भाग

सुकलेला भाजीपाला यापासून पिकलेली वांगी पासून खुला तयार करतात. कच्चे आंबेपासून खुला तयार करतात. टमाटर पासून खुला तयार करतात. कारलीच्या खुला करतात आणि या सर्व वाळवणीचा साठवण करुन पावसाळ्यात भाजी करत असतात.

महिलांची रंगत संगत खुमासदार

गाव कुसातील महिला ज्या महिलांकडे वाळवणी, खुला वगैरे करायचे असले की पाच सहा महिला आणि काही चिमुकली मुली एकत्र जमून तयार करतात. मग त्यामध्ये अनेक प्रकारची चर्चा होते. काही साठविलेल्या जुन्या आठवणी जाग्या होतात.

म्हातारी महिला ही आणखीनच चर्चांना भर घालत रंगवून गोष्ट आपल्या खुमासदार शैलीत सांगत असतात. अशी रंगत संगत करत वाळवणीचा काम पूर्ण करुन कधी चहा, कधी नास्टा तर जेवणही खाऊ घालतात हे चित्र आजही खेड्यातील घरामध्ये पाहायला मिळतात.

कथा–कहणी ही वाळवणीचा आधार

ग्रामीण भागातील महिला एकत्र जमल्या की वाळवणचे कार्य हाती घेत महिलांना कामात रंगवायला कथा–कहणी सांगत बैठक तयार करतात. राजे, राजवाडे कथा, पुस्तकांच्या कथा, काही दंत कथा आदींचा आधार घेत वाळवणीचे काम महिला वर्ग करतात.

# निफाडला निवडणुकीत मतदारांचा उत्तम प्रतिसाद

## नव मतदारांचा उत्साह राष्ट्रीय कर्तव्य बजावल्याचा आनंद





निफाड/प्रतिनिधी

दिंडोरी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर सोमवार दि. २० मे रोजी निफाड शहरासह ग्रामीण भागातील नागरिकांनी उत्साहाच्या वातावरणात आपला मतदानाचा हक्क बजावला. सायंकाळी पाच वाजेपर्यंत निफाड मतदार संघात५७.१०/.ईतके मतदान नोंदविण्यात आले आहे, दिंडोरी लोकसभा मतदारसंघा अंतर्गत २७२ मतदान केंद्र असून मतदानासाठी सज्ज करण्यात आली होती,दिंडोरी लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडीचे उमेदवार भास्कर भगरे तर महायुतीचे भाजपाचे उमेदवार मंत्री डॉ. भारती पवार यांच्यात खरी लढत दिसून आली.

निफाड मतदार संघातील जनता कोणत्या उमेदवाराच्या पारड्यात भरभरून मतदान टाकेल याकडे संपूर्ण दिंडोरी लोकसभा मतदारसंघातील जनतेचे लक्ष लागून आहे , काही ठिकाणी कांदा टोमॅटो सह शेतीमालाच्या प्रश्र्नावर तालुक्यात शेतकरी वर्ग निदर्शने करतांना दिसुन आले, महायुती आणि महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये मतदान करून घेण्यासाठी यावेळी चढाओढ सुरू होती ,

उन्हाचा त्रास होत असतानाही या उन्हाला न जमता मतदारांनी लोकशाही मूल्यांचा आदर करत शांततेत मतदानाचा हक्क बजावला, निफाड तालुक्यातील ग्रामीण भागात देखील मतदारांचा उत्साह चांगला दिसून आला, यावेळी प्रत्येक मतदान केंद्राच्या बाहेर सुंदर अशा रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या, मतदानाला येणाऱ्या मतदार राजासाठी कुठली समस्या निर्माण होऊ नये यासाठी सर्व सुविधा करण्यात आल्या होत्या, निफाड विधानसभा मतदारसंघाच्या सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा निफाडच्या प्रांताधिकारी हेमांगी पाटील, यांच्या नेतृत्वात उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल पालवे, तहसीलदार विशाल नाईकवाडे, निफाड नगरपंचायत मुख्य अधिकारी अमोल चौधरी, निफाड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी महेश पाटील, निफाड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नंदकुमार कदम, व अधिकारी कर्मचारी यांनी निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर जोरदार तयारी केली होती या लोकशाहीच्या महोत्सवात कुठल्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये मतदान प्रक्रिया शांततेत पार पडावी यासाठी प्रयत्नशील होते,

# उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत जाहिरात होडींगवर कार्यवाही कारवाई



**उल्हासनगर प्रतिनिधी/बाळासाहेब अहिरे**

दिनांक १३.०५.२०२४ रोजी घाटकोपर, मुंबई येथे जाहिरात फलक कोसळून झालेली दुर्घटना पाहता राज्यात अन्य ठिकाणी मान्सून पूर्व कालावधीत तसेच मान्सून कालावधीत अन्य ठिकाणी अशा दुर्घटना होऊन जीवत हानी होऊ नये म्हणून उल्हासनगर महागनरपालिका क्षेत्रातील सर्व जाहिरात फलकांचे संरचनात्मक परीक्षण करण्यात यावे तसेच तपासणीअंती अवैध व धोकादायक असणारे जाहिरात फलक तातडीने निष्कासनाची कार्यवाही करुन संबधितावर नियमानुसार कठोर कारवाई करणेसाठी मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अजीज शेख यांनी सर्व सहायक आयुक्त, प्रभाग समिती यांना आदेश दिले होते.त्यानुसार अतिरिक्त आयुक्त (शहर) श्री. जमीर लेंगरेकर यांचे निर्देशानुसार व उप आयुक्त श्री.किशोर गवस यांचे मार्गदर्शनाखाली सहायक आयुक्त, प्रभाग समिती यांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील सर्व जाहिरात फलकांचे संरचनात्मक परीक्षण करणेसाठी व बेकायदेशिर होर्डिंग हटविणेसाठी एकुण ४७ नोटीस बजावणी करण्यात आल्या होत्या. त्या अनुषंगाने आज दिनांक २१/५/२०२४ पासून शहरातील अनधिकृत होर्डिंगविरुद् कारवाई सुरु करण्यात आली असून कल्याण अंबरनाथ या मुख्य रस्त्यावर वेलकम गेट जवळ, शांतीनगर, उल्हासनगर– ४२१००३ या ठिकाणी असलेले विनापरवानगी अनधिकृत होर्डीग कापून हटविण्यात आले आहे. यापुढे देखिल उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील विनापरवानगी अनधिकृत होडींग, जाहिरात फलकांवर दैनदिन नियमितपणे महापालिकेमार्फत धडक कारवाई सुरु ठेवण्याचे आदेश मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, यांनी सर्व सहायक आयुक्त, प्रभाग समिती यांना आदेश दिलेले आहेत.

# केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले उत्तर भारत दौऱ्यावर रवाना

## स्टार प्रचारक म्हणुन एन.डी.ए.उमेदवारांचा प्रचार करणार

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले हे आज लोकसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी उत्तर भारत दौऱ्यावर रवाना झाल आहेत.राष्ट्रीय लोकशाही आघाडी(एनडीए) चे रामदास आठवले हे राष्ट्रीय स्तरावर स्टार प्रचारक आहेत.मुंबईतुन आज त्यांनी दिल्ली ला प्रयाण केले.दिल्ली येथून आज दुपारी हरियाणाच्या सोनीपथ,कर्नाल आणि अंबाला या लोकसभा मतदार संघात भाजप उमेदवारांचा प्रचार ना. रामदास आठवले करणार आहेत.कर्नाल येथे भाजपचे हरियाणा चे माजी मुख्यमंत्री मनोहरलाल खट्टर लोकसभा निवडणुक लढत आहेत.त्यांच्या प्रचारासाठी ना.रामदास आठवले कर्नाल येथे उपस्थित राहणार आहेत.दि.२२ मे रोजी ना.रामदास आठवले उत्तर प्रदेश मधील विविध लोकसभा मतदार संघात भाजप उमेदवारांचा प्रचार करणार आहेत.दि.२२ रोजी जौनपुर येथे भाजप उमेदवार कृपाशंकर सिंग यांच्या प्रचारासाठी ना.रामदास आठवले जौनपुर येथे रोड शो आणि जाहिर सभांना संबोधित करणार



आहेत.दि.२२ आणि २३ मे रोजी ना.रामदास आठवले जौनपुर,वाराणसी,सारनाथ या ठिकाणी ते भेटी देणार आहेत.वाराणसी लोकसभा मतदार संघात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी निवडणुक लढत आहेत.दि.२५ मे रोजी ना.रामदास आठवले पंजाब राज्यात भाजप एनडीए उमेदवारांचा प्रचार कारणार आहेत. दि.२७ मे रोजी ना.रामदास आठवले हे सुप्रसिध्द अभिनेत्री कंगणा राणावत या भाजप तर्फे निवडणुक लढत असलेल्या हिमाचल प्रदेशातील मंडी लोकसभा मतदार संघात प्रचार सभांना संबोधित करणार आहेत. दरम्यान दि.२३ मे रोजी महाकारुणी तथागत भगवान गौतम बुध्द यांची २५८६वी जयंती बुध्द पौर्णिमा सारनाथ येथील प्राचीन धम्मेक स्तुप येथे साजरी करण्यात येणार आहे.बुध्द जयंतीचा मंगल उत्सव सारनाथ येथे ना.रामदास आठवले साजरा करणार आहेत अशी माहिती रिपब्लिकन पक्षाच्या वतीने देण्यात आली आहे.

# कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाचे एच. एस.सी.बोर्ड परीक्षेत उज्वल यश

**पंढरपूर/प्रतिनिधी**

येथील रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाचा एच. एस. सी. बोर्ड परीक्षेचा ऑनलाईन निकाल नुकताच जाहीर झाला आहे. विद्याशाखानिहाय शेकडा निकाल व पहिले तीन क्रमांक खालीलप्रमाणे

विज्ञान विभाग शेकडा निकाल ९९.७४% प्रथम क्रमांक कु. रोपळकर सिद्धी संतोष ९२.१७ %, द्वितीय क्रमांक कु. रोपळकर रिद्धी संतोष ९१.८३% तृतीय क्रमांक चि. लबडे सौरभ समाधान ९१.३३% वाणिज्य विभाग शेकडा निकाल ९८.९३% प्रथम क्रमांक कु. गांधी निष्ठा परेश ९३.१७% द्वितीय क्रमांक चि. काळे संस्कार विलास ९०.१७% तृतीय क्रमांक चि. गांधी सोहम अमित ८९.५० % कला विभाग शेकडा निकाल ८७.५०% प्रथम क्रमांक कु. सरगर स्नेहल दाजी ८५.८३% द्वितीय क्रमांक चि. मंजुळे अविष्कार अनिल ८०.६७% तृतीय क्रमांक कु. इंगळे अदिती मनमोहन ७९.८३%

एम. सी. व्ही. सी. शेकडा निकाल ९४.५५ % प्रथम क्रमांक कु. देशमुख राधा ज्ञानेश्र्वर ८२.८३% द्वितीय क्रमांक चि. भिंगे श्रीराम दत्तात्रेय ७६% तृतीय क्रमांक कु. साळुंखे श्र्वेता संतोष ७५.८३% बुक कीपिंग अँड अकाउंटन्सी या विषयात शंभर पैकी १०० गुण मिळवणारे विद्यार्थी पुढीलप्रमाणे कु. गांधी निष्ठा परेश, चि. काळे संस्कार विलास,

चि. भोपळे सिद्धांत आनंद, चि. जोशी सार्थक जिनेन्द्र, चि. उंडाळे ओम विजय, कु. साठे अर्पिता सुभाष, कु. वाघमारे स्नेहल संजय, कु. पोद्दार श्रावणी महेश तर विज्ञान विभागात गणित या विषयात शंभर पैकी १०० गुण मिळवणारे विद्यार्थी कु. रोपळकर सिद्धी संतोष, कु. रोपळकर रिद्धी संतोष व मुलानी वाजिद वजुद्दीन यशस्वी विद्यार्थ्यांचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे यांनी हार्दिक अभिनंदन केले व त्यांना पुढील भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी पर्यवेक्षक प्रा. युवराज अवताडे, प्रा. राहुल मुसळे, प्रा. राजाराम गोडसे, प्रा. राजाराम भोसले, प्रा. महादेव जेधे, प्रा. शिवाजी तांदळे, प्रा. सिताराम सावंत, प्रा. कु. लक्ष्मी वाघमारे, प्रा. कु. वर्षा भिवसकर आदी प्राध्यापक व कार्यालयीन अधीक्षक प्रभाकर पारधी उपस्थित होते.

# जगदगुरू पंचाचार्य उच्च माध्यमिक प्रशालेचे शंभर टक्के निकाल

**अक्कलकोट/प्रतिनिधी**

गौडगाव बु (ता.अक्कलकोट) श्री गुरु सिद्धमल्लेश्र्वर कल्याण केंद्र संचलित श्री जगदगुरू पंचाचार्य उच्च माध्यमिक प्रशालेच्या फेब्रुवारी व मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता बारावी परीक्षेच्या निकाल शंभर टक्के लागला असून कुमारी धनश्री मलकणा पाटील ८१ टक्के गुण घेत प्रथम पटकावले तर कुमारी दाईहलीमा चांद व्हसुरे८०टक्के तर कुमारी सृष्टी सूर्यकांत मरब हिने ७६ टक्के गुण मिळवत द्वितीय मिळविली आहे.विशेष प्राविण्य उत्तीर्ण०३,प्रथम श्रेणी उत्तीर्ण १८,द्वितीय श्रेणी उत्तीर्ण१२यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे विश्र्वस्त ,शिवाचार्यरत्न श्री.ष.ब्र.डॉ. जयसिद्धेश्र्वर शिवाचार्य महास्वामीजी, संस्थेचे सर्व पदाधिकारी,प्राचार्य कल्याणी देशेट्टी व गावकऱ्यांनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिले आहे.



# प्रबुद्ध भारत चारिटेबल ट्रस्ट बार्शी यांचा श्रावस्ती बुद्ध विहाराचा लोकार्पण सोहळा

**बार्शी/प्रतिनिधी:**

बार्शीच्या सांस्कृतिक क्षेत्रामध्ये प्रबुद्ध भारत चॅरिटेबल ट्रस्टने एक आगळे वेगळे स्थान निर्माण केले आहे. काही समविचारी मित्रांनी एकत्र येऊन या ट्रस्टची स्थापना केली. बार्शीच्या सांस्कृतिक क्षेत्रांमध्ये या ट्रस्टने मोलाची भर टाकलेली आहे. बार्शीत बुद्ध विहार असावे असा विचार मांडला गेला त्यातूनच तीन एकर जमिनीची खरेदी केली.२००९ मध्ये या ट्रस्टचे रजिस्ट्रेशन करण्यात आले. आज ट्रस्ट कडे एक एकर जमीन असून याच जमिनीमध्ये संकल्पित बुद्ध विहार निर्माण केले जात आहे त्याचा पहिला भाग म्हणून ३०x ३० चे पत्र्याचे शेड उभा करण्यात आले आहे. त्यामध्ये बैध्द मुर्ती स्थापन हॉल भिक्खू निवासस्थान व किचन अशी व्यवस्था करण्यात आलेली आहे.



१९५६ ला धर्मांतराच्या वेळी बाबासाहेब म्हणाले होते की माझे हे बुद्ध विहार नवयान आहे अन् यात उर्जा केंद्र व्हावीत. हाच उद्देश डोळ्यासमोर ठेवून श्रावस्ती बुद्ध विहार निर्माण केले जात आहे. या विहारांमध्ये विद्यार्थ्यांसाठी अभ्यास केंद्र, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, विविध क्षेत्रातील व्यक्तींना वेगवेगळ्या पातळीवरचे प्रशिक्षण दिले जाईल, गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी वसतीग्रह निर्माण करण्याचा ट्रस्टचा मानस आहे.

२३ मे २०२४ रोजी बुद्ध पौर्णिमेच्या निमित्ताने श्रावस्ती बुद्ध विहाराचे लोकार्पण पूज्य भन्ते सुमेध नागसेन यांच्या हस्ते संपन्न होत आहे. या कार्यक्रमासाठी बार्शी शहर व परिसरातील सर्व समाज बांधव यांनी उपस्थित रहावे असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष विष्णु कांबळे यांनी केले. पत्रकार परिषद मध्ये हि माहिती दिली त्या वेळेस संस्थेचे खजिनदार प्राध्यापक शशिकांत गायकवाड, सहसचिव प्राध्यापक अशोक वाघमारे, रमेश गवळी सर, जयद्रथ गायकवाड, बौद्धाचार्य दीपक कांबळे, सुनिल कांबळे,नागनाथ सोनवणे,भिमराव कदम सर, पत्रकार अनिल खुने हे उपस्थित होते

दैनिक
यश सिद्धि न्यूज



## बेवारस मयताबाबत संपर्क साधण्याचे आवाहन

**पंढरपूर/प्रतिनिधी**

पंढरपूर - निजामाबाद एक्सप्रेस गाडीला धडक लागून एका अनोळखी व्यक्तीच्या डोक्यास जखमी मार लागून जखमी झाला.सदर व्यक्तीस उप जिल्हा रुग्णालय, पंढरपूर येथे उपचारासाठी दाखल केले परंतु त्यास पुढील उपचारास सिव्हील हॉस्पिटल सोलापूर येथे दाखल केले असता उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. सदर मयत व्यक्तीबाबत माहिती असल्यास सबंधितांनी रेल्वे पोलीसांशी संपर्क साधवा असे, आवाहन पंढरपूर रेल्वे पोलीसांनी केले आहे.अनोळखी मयत व्यक्तीचे वय अंदाजे ३५ वर्षे असून , उंची ५ फुट ५ इंच, अंगाने सडपातळ, रंगाने निमगोरा, केस काळे-पांढरे, उजव्या हातावर महादेव व मनगटावर आई असे गोंदलेले, अंगात पांढरे कापड असे मयत व्यक्तीचे वर्णन आहे. संबधीतांनी तसेच ओळखीच्या व्यक्तीने याबाबत पंढरपूर लोहमार्ग पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे .

## सुनंदा सोनवणे यांचे निधन

**पंढरपूर/प्रतिनिधी**



हरीनयन पार्क, इसबावी येथील श्रीमती सुनंदा अशोक सोनवणे (वय -६८ ) यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले.त्यांच्या पश्चात दोन मुले, सूना व नातवंडे आहेत. त्या अत्यंत धार्मिक वृत्तीच्या व मनमिळावू होत्या. त्यांच्या निधनाने इसबावी परिसरात शोककळा पसरली. श्री. विठ्ठल अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रा.डॉ.सचिन सोनवणे यांच्या त्या मातोश्री होत. त्यांच्या अंत्ययात्रेत स्वेरी परिवारासह परिसरातील सर्व स्तरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अक्कलकोट, मैंदर्गी, दुधनी शहराच्या पाणी टंचाई नियोजनासाठी त्वरित मुख्याधिकाऱ्यांनी लक्ष घालावे : नागरिकांचे मागणी

**अक्कलकोट/प्रतिनिधी**

अक्कलकोट, मैंदर्गी, दुधनी शहराच्या पाणी टंचाई बाबत प्रशासक असलेल्या मुख्याधिकाऱ्यांनी बाकीचे कामे थांबून पाणी पुरवठ्याला महत्व देऊन कार्यरत राहण्याची मागणी शहर वाशियातून होत आहे. दरम्यान तालुक्यातील ग्रामीण भागातील ४९ गावांचे पाणी टंचाई आराखडयांतर्गत प्रस्ताव दाखल करण्यात आले आहेत. पाणी टंचाई मात्र रौद्र रूप धारण केलेले आहे. संपूर्ण तालुक्याच्या पाण्याचे नियोजन होणे गरजेचे आहे.

अक्कलकोट, मैंदर्गी, दुधनी शहरातील पाणी टंचाई देखील उग्ररूप धारण केले आहे. प्रशासक असलेल्या मुख्याधिकाऱ्यांकडून शहराच्या पाणी टंचाई बाबत गांभीर्याने घेत नसल्याचे



शहर वाशियातून बोलले जात आहे. वरकमाईच्या कामांना महत्व देत, लोकसभा निवडणुकीचे कारणे सांगत होते, आता निवडणूक संपूनही बेजबाबदारपणे टंचाई स्थितीकडे दुर्लक्ष केले जात आहे. अक्कलकोट, मैंदर्गी, दुधनी शहराच्या पाणी टंचाई बाबत जिल्हाधिकारी, प्रांताधिकारी, जिल्हा पालिका अधिकारी, तहसीलदार यांनी त्वरित लक्ष घालण्याचे मागणी पुढे येत आहे.

**धरण उशाला..! कोरड घशाला..!! :**

नुकतेच अक्कलकोट शहरास पाणी पुरवठा करणाऱ्या कुरनुर धरणास माजी पाणीपुरवठा सभापती रामचद्र समाणे यांनी भेट दिली. सध्या धरणातील उपलब्ध पाणी साठा योग्य नियोजन केल्यास पाच-सहा दिवसाआड शहरास पाणी पुरवठा होऊ शकतो. उपलब्ध पाणी साठा काटकसरीने दोन ते तीन महिने वापरणे शक्य असल्याचे माजी पाणी पुरवठा सभापती रामचंद्र समाणे यानी प्रस्तुत प्रतिनिधींना सांगितले. नगर पालिका प्रशासनास पाणी पुरवठा विभागास सुरळीत पाणी पुरवठा होण्या संदर्भात नियोजनबाबत काही अडचणी असल्यास नियोजना करिता मदत करू, सध्याची अवस्था म्हणजे धरण उशाला..! कोरड घशाला..!! अशी झाली असल्याचे समाणे यांनी सांगितले.

**अक्कलकोट शहराला सध्या दहा दिवसआड एकदा पाणी पुरवठा :**

शहराला सध्या दहा दिवसआड एकदा पाणी पुरवठा केला जात आहे. पाणी उपसा करिता विज खंडीत झाल्यान आवश्यक साठा होण्यात अडचणी येतात. एक्सप्रेस फ्रीडर लाईन नसल्याने पाणी उपशात अडचणी येतात. सर्वांत महत्वाचा मुद्दा म्हणजे कुरनुर धरणातील उपलब्ध पाणीसाठा. गत वर्षात अत्यल्य पाऊस झाल्याने धरणातील पाणी साठ्याने तळ गाठला आहे. धरणातील उपलब्ध पाणी साठा योग्य नियोजन केल्यास दहा दिवसा आड होणारा पाणी पुरवठा सहा दिवसाआड होऊ शकतो. उपलब्ध पाणी साठा काटकसरीने पाचसहा दिवसा आड व दोन तीन महिने पुरेल पद्धतीने नियोजन करणे आवश्यक आहे.

# गादेगावच्या सरपंच पदी सौ.सीमा बागल यांची निवड

**पंढरपूर/प्रतिनिधी**

गादेगाव च्या सरपंच पदी सौ सीमा बालाजी बागल यांची बिनविरोध निवड करण्यात आली निवडीनंतर नूतन सरपंच सीमा बागल यांचा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला

सरपंच निवडीचा कार्यक्र क्रम ग्रामपंचायत च्या कार्यालयामध्ये करण्यात आला यावेळी मिरवणूक काढून प्रमुख म्हणून मंडेश्र्वर विभागाची सर्कल दिनेश सहाय्यक निवडणूक अधिकारी म्हणून समीर पटेल उपस्थित होते गादेगाव ग्रामपंचायत मध्ये सत्ता परिवर्तन झाल्यापासून सर्वांना समान संधी या धोरणाने प्रत्येकांना एक वर्ष सरपंच देण्याची ठरले होते त्याप्रमाणे मागील तीन वर्षात तीन सरपंच नुकतेच सौ दिपाली धनाजी बागल यांनी आपला पदाचा राजीनामा दिल्यामुळे दिल्यामुळे रिक्त जागेवर सौ सीमा बालाजी बागल यांची बिनविरोध निवड करण्यात आली यावेळी विठ्ठलचे माजी संचालक सूर्यकांत बागल उद्योगपती पद्माकर बागल मोहन बागल स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे तानाजी बागल युवा सेना जिल्हाप्रमुख धनाजी बागल भाजप जिल्हा उपाध्यक्ष गणेश बागल महादेव पाटील विकास भोसले माजी सरपंच ज्योती बाबर ग्रामसेवक खंडागळे ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते निवडीनंतर गादेगाव मध्ये आनंद उत्सव साजरा करण्यात आला



# सातारा येथे कौशल्य आणि उद्योजकता विकास प्रशिक्षणास प्रारंभ

**पुणे/दैनिक यशसिध्दि न्यूज**

डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे आणि सायन्स अँड टेक्नॉलॉजी पार्क यांच्या संयुक्त विद्यमाने सातारा येथे कौशल्य आणि उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचा शुभारंभ दिनांक १७ मे २०२४ रोजी करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून श्री. अनिल कारंडे, उपजिल्हाधिकारी व कौशल्य विकास विभागप्रमुख (बार्टी) पुणे, तर मुख्य अतिथी म्हणून श्री. महेश गवई, प्रकल्प व्यवस्थापक, (बार्टी) पुणे, डॉ. बी. टी. जाधव, प्राचार्य यशवंतराव, इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स सातारा तसेच डॉ. राजेंद्र मोरे, प्राचार्य, शिवाजी कॉलेज सातारा, श्रीकांत कुंदन, संचालक उखखख सेंटर सातारा , सायन्स अँड टेक्नॉलॉजी पार्क अंतर्गत श्री. मनोज कुलकर्णी व श्री. वैभव निमगिरे हे उपस्थित होते.

अनुसूचित जातीच्या उमेदवारांच्या उत्थानासाठी हा उपक्रम श्री. सुनील वारे खठ-ड, महासंचालक (बार्टी) पुणे आणि डॉ. राजेंद्र जगदाळे, सीईओ आणि महासंचालक एसटीपी यांनी घेतला असून त्यासाठी विशेष प्रयत्न व मार्गदर्शन श्री. सुमंत भांगे ,सचिव, सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग यांनी केले आहे.सदर कौशल्य विकास कार्यक्रम अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी पूर्णतः विनामूल्य आहे.

# भरडधान्य पिकांच्या पुस्तिकेमध्ये शिफारशी, सुधारणा सुचविण्याचे कृषी विभागाचे आवाहन

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

भरडधान्य, पौष्टिक तृणधान्य, कडधान्य व गळीतधान्य पिकांचे क्षेत्र, उत्पादन व उत्पादकता वाढविण्यासाठी कृषी विभागामार्फत पुस्तिका तयार करण्याचे काम सुरू आहे. या पुस्तिकेत या पिकांचे पेरणीपासून काढणीपर्यंतचे लागवड तंत्रज्ञान, कीड रोग व्यवस्थापन याविषयी माहिती देण्यात येणार आहे. या पुस्तिकेच्या मजकुराचा क्युआर कोड सोबत देण्यात येत आहे. या पुस्तिकेमध्ये काही शिफारशी, सुधारणा तसेच अतिरिक्त माहिती द्यावयाची असल्यास कृषी आयुक्तालयाच्या ddinfor@gmail.com या ई-मेलवर कळविण्यात याव्यात, असे आवाहन कृषी आयुक्तालयाचे कृषी संचालक (विस्तार व प्रशिक्षण) विकास पाटील यांनी केले आहे.

# ए.आर.टी. सेवेला वीस वर्षे झाल्याबद्दल ए.आर.टी.विभाग व डापकूचा सत्कार संपन्न

**सोलापूर/प्रतिनिधी**

एच.आय.व्ही. सहज जीवन जगणाऱ्या लोकांसाठी शासनाच्या वतीने ए. आर. टी. औषधोपचार मिळवून देण्यासाठी ए.आर.टी. केंद्र सुरू करण्यात आले. या सेवेला वीस वर्षे पूर्ण झाल्याबद्दल नेटवर्क ऑफ महाराष्ट्र बाय पीपल लिविंग विथ एच. आय. व्ही. एड्स व नेटवर्क ऑफ सोलापूर बाय पीपल लिविंग विथ एच.आय.व्ही.एड्स यांच्या संयुक्त विद्यमाने छ. शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर - ए.आर.टी. केंद्र व जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण केंद्र सोलापूर यांचा गौरवचिन्ह, प्रमाणपत्र, शाल व बुके देऊन गौरविण्यात करण्यात आला.

यावेळी डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सदानंद भिसे, ए.आर.टी विभागाच्या वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. अग्रजा चिटणीस-वरेरकर, जिल्हा कार्यक्रम अधिकारी भगवान भुसारी, एन. एस. ओ. पी. प्लस संस्थेचे अध्यक्ष आनंद लांडगे, सचिव समाधान माळी, विजय भावुले, सुनिता तडसरे, सचिन तिवारी, विहान प्रकल्पाच्या प्रकल्प समन्वयिका विजयश्री आमले, जिल्हा सुपरवायझर कृष्णा सकट आदी उपस्थित होते.

ए.आर.टी केंद्राच्या वतीने वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. अग्रजा चिटणीस-वरेरकर व डापकू च्या वतीने जिल्हा कार्यक्रम अधिकारी भगवान भुसारी यांनी सत्कार स्वीकारला तर अधिष्ठाता डॉ. सदानंद भिसे व समाधान माळी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.याप्रसंगी बोलताना अधिष्ठाता डॉ. सदानंद भिसे म्हणाले की, आपल्या ए. आर. टी. केंद्रात येणाऱ्या प्रत्येक रुग्णाला आपुलकीची, प्रेमाची, सहानुभूतीची, आपले पण अशी वागणूक मिळते. या आपल्या सेवाभाव मुळे रुग्णाला ए.आर.टी. केंद्र हे आपले दुसरे घर आहे अशी भावना तयार होते. ए.आर.टी. सेवेमुळे एच.आय.व्ही. सहजीवन जगणाऱ्या लोकांना जगण्याचे नवे बळ मिळाले आहेडॉ. अग्रजा चिटणीस-वरेरकर या सत्काराला उत्तरदेताना म्हणाल्या की, ए. आर. टी. मध्ये येणाऱ्या प्रत्येक




रुग्णाला अँटीरेट्रो व्हायरल थेरपीचे औषध घेण्यातील सातत्य, सकारात्मक जीवनशैली, योग्य आहार व विहार, शासनाच्या विविध योजना आदींची इत्यंभूत माहिती मिळत असल्याने रुग्णाचे जीवनमान उंचावले आहे. एचआयव्ही सहज जीवन जगणाऱ्या रुग्णांना विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यात ए.आर.टी केंद्र, सोलापूर व एन.एस. ओ. पी. प्लस संचलित विहान प्रकल्पाचा सिंहाचा वाटा आहे.यावेळी जिल्हा कार्यक्रम अधिकारी भगवान भुसारी व ए. आर. टी. औषधे घेण्यात सातत्य असणाऱ्या रुग्णांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्तविक समाधान माळी यांनी केले. सूत्रसंचालन सचिन राठोड यांनी केले तर आभार अनिता बनसोडे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विजयश्री आमले, आरती रेड्डी, सत्यवान कांबळे, मल्लिकार्जुन पाटील, सचिन राठोड, अनिता बनसोडे आदींनी मोलाचे परिश्रम घेतले.

# संत सोपानदेव पालखी सोहळ्याचे ३ जुलैला प्रस्थान

**वेळापूर/प्रतिनिधी**

श्री संत ज्ञानेश्वर महाराजांचे धाकटे बंधू श्री संत सोपानदेव महाराज पालखी सोहळ्याचे सासवडमधून बुधवार, ३ जुलै रोजी सकाळी ११ वाजता सोपानदेव मंदिरातून प्रस्थान होणार आहे. या सोहळ्याच्या कामाला आता वेग आला आहे, अशी माहिती पालखी सोहळाप्रमुख विश्वस्त ॲड. त्रिगुण गोपाळ गोसावी यांनी दिली. बुधवार, ३ जुलै रोजी सकाळी ११ वाजता संत सोपानदेव मंदिराच्या देऊळवाड्यातून पालखी प्रस्थान सोहळ्याला प्रारंभ होईल. त्यानंतर दुपारचा विसावा पिंपळे तर पांगारेतील निष्णाईदेवी मंदिरात रात्रीचा मुक्काम होईल.

गुरुवार, ४ रोजी यादववाडीत सकाळचा विसावा होऊन परिंचेत दुपारचा नैवेद्य तर मांडकीत रात्रीचा मुक्काम होईल. शुक्रवार, ५ जुलैला सकाळचा विसावा जेऊर, पिंपरे खुर्दमधून निरेत दुपारचा नैवेद्य तर बारामतीतील निंबुतमध्ये रात्रीचा मुक्काम असणार आहे. ६ रोजी निंबुत छपरी, वाघळवाडीमार्गे सोमेश्वरनगरमध्ये पहिले गोल रिंगण होऊन मुक्काम होईल. ७ रोजी करंजेपूलमध्ये सकाळचा विसावा तर १० रोजी फाटामध्ये दुपारचा नैवेद्य, वडगाव निंबाळकरमध्ये दुपारचा विसावा होऊन कोहळे बुद्रुकमध्ये मुक्काम होईल.

८ जुलैला कठीणपूलमध्ये सकाळचा विसावा तर पणदरेत दुपारचा नैवेद्य, माळेगावमध्ये संध्याकाळी दुसरे गोल रिंगण होऊन मुक्काम होईल. ९ रोजी कोकाटे महाराज वस्तीत दुपारचा विसावा होऊन बारामतीमधील शारदा प्रांगण येथे मुक्काम होईल. १० रोजी मोतीबागमध्ये सकाळचा विसावा तर पिंपळीत पहिले बकरी रिंगण होईल.

भवानीनगर, सणसर, बेलवाडी फाटामध्ये दुपारचा विसावा होऊन लासुर्णेत मुक्काम. ११ जुलै रोजी लालपुरीत सकाळचा विसावा, कळंबमध्ये दुपारचा नैवेद्य तर निमसाखरमध्ये दुपारचा विसावा होऊन रात्री निरवांगीतील पालखी तळावर सोहळा मुक्कामी पोहोचेल. १२ रोजी पालखीचा रेडणीत सकाळचा विसावा, दुपारचा नैवेद्य लाखेवाडीत तर निरनिमगाव चौकात दुपारचा विसावा होऊन अकलूजमध्ये मुक्काम होईल. १३ जुलैला बाबीर पूल, महाळुंगमध्ये सकाळचा विसावा, श्रीपूरमध्ये दुपारचा नैवेद्य तर माळखांबीत दुपारचा विसावा होऊन बोंडलेत मुक्काम असणार आहे. १४ रोजी बोंडलेत संत सोपानदेव महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराज बंधू भेट सोहळा होईल आणि भंडीशेगावमध्ये मुक्काम होईल. १५ जुलै रोजी दुपारी वाखरीत उभे रिंगण आणि पालख्यांच्या भेटीचा सोहळा तसेच पालखीचा मुक्काम असणार आहे.

मंगळवार, १६ जुलैला पालख्यांचे वाखरी पादुकाजवळ उभे रिंगण होऊन श्रीक्षेत्र पंढरपूरमध्ये आगमन होईल, अशी माहिती पालखी सोहळाप्रमुख विश्वस्त ॲड. गोपाळ गोसावी यांनी दिली.



# तुकाईनगर परिसरात गटारीचे पाणी रस्त्यावर

**मंगळवेढा/प्रतिनिधी**

दामाजीनगर ग्रामपंचायत हद्दीतील तुकाईनगर येथे गटार तुंबून घाण पाणी सर्व परिसरात पसरत असल्याने दुर्गंधीने रोगराई निर्माण होण्याची भीती व्यक्त होत आहे. दामाजीनगर ग्रामपंचायत हद्दीत तुकाईनगरमधील गोसडे यांच्या निवासस्थानाजवळ गटार तुंबल्याने गेले २० ते २५ दिवस संपापासून घाण पाणी संपूर्ण परिसरात पसरले आहे. यामुळे रोगराई होण्याची शक्यता आहे. हा सर्व प्रकार ग्रामसेवक व सदस्यांना माहीत असतानाही याची दुरुस्ती केली जात नसल्याने ग्रामपंचायतीच्या कारभाराबाबत संतापजनक प्रतिक्रिया उमटत आहेत. ग्रामपंचायत सदस्यांनी तत्काळ दुरुस्ती केली जाईल, असे आश्वासन दिले. तसेच ग्रामसेवक यांनीही सदर घटनेच्या ठिकाणी भेट देऊन पाहणी केली. मात्र दुरुस्तीचा मुहूर्त अद्याप लागलेला नाही.